# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२५/०७/२०१६.

**१) ट्रकने ट्रकला धडक दिल्याने, एकाचा मृत्यु . :—**

दिनांक २४/०७/२०१६ रोजी ०२.०० वा. दर. आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन समोरुन येणा—या ट्रक क. एमएच ३४ एबी १३६९ ला निलज भुयार रोड येथे धडक मारुन शिंभु कार्तीकेयन पनीकर वय ४० वर्ष, रा. अंतरीकल तहसील कुन्डल जि. पतनमटीया याचे जागीच मरणास कारणीभुत झाले. असे फिर्यादी मुजफरखॉ मनसुरखॉ पठाण वय ३० वर्ष, रा. कमला वार्ड जवाहरनगर वडसा जि. गडचिरोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**२)काठीने डोक्यावर मारुन जखमी केले . :—**

दिनांक २२/०७/२०१६ रोजी १६.३० वा. दर. फिर्यादी विठोबा यादोराव वनवे वय ७५ वर्ष, रा. नेहरु वार्ड वरठी हा आपल्या घरी हजर असतांना उज्वला बागडे वय ४५ वर्ष, हिने फिर्यादीच्या ''घरासमोर येवुन ही गोरी गाय कोणाची आहे'' असे म्हणुन भांडण केला. फिर्यादीला शिविगाळ करुन घराचे शेड मध्ये येवुन रिपोर्ट हातात असलेल्या काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केले. असे फिर्यादी यांचे तोडी व डॉ. रिपोर्ट पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४,४५२,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहे.

**३) खोटे आश्वासन देवुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २४/०७/०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील दोन्ही आरोपीतांनी लाखनी येथील अलंकार लॉजचे खोली क्र. १५ मध्ये पुजेचे सामान देवीदेवताचे फोटो मांडुन दि.२४/०७/२०१६ ला प्रकाशीत पत्रकाराप्रमाणे तुम्हाला संतान करुन देतो. असे सांगुन फिर्यादी कडुन तपासनी म्हणुन ५०/—रु. व दुस—या दिवशी पुजे करीता लागणारे साहीत्य व येणारा खर्च म्हणुन ८००/—रु. आणण्यास साांगितले अशा त—हेने लोकांना खाटे आश्वासन देवुन भोळयाभावळया लोंकाची फसवणुक केली. असे फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३(२)महाराष्ट्र जादुटोना प्रतिबंधक कायदा २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. कुंभरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक २५/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०१ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व इतर वाहनांवरती ९७ केसेस करण्यात आलेल्या आहेत

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

२५/७/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.